ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाविवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख २१ नोव्हेंबर, १९५१ अंक ४४

## विविध माहिती

**परदेशी डॉक्टरांचा दौरा**—निरनिराळ्या ८ देशांतील २१ डॉक्टर्सनीं भारतांत ६ आठवड्यांचा दौरा काढला होता. हा दौरा लंडनमधील इंडिअन मेडिकल असोसिएशनतर्फे घडवून आणण्यांत आला होता. ह्या मंडळींत कांहीं शस्त्रवैद्य आणि खास विषयांचे अभ्यास केलेले डॉक्टर्स होते. जर्मनी, इंग्लंड, बेलजिअम, स्वीडन, स्वित्झरलंड, इत्यादि देशांचे प्रतिनिधी मंडळांत होते.

**अमेरिकेचें कापसाचें पीक**—अमेरिकेच्या शेतकी खात्यानें चालू वर्षीच्या कापसाचा अंदाज सुमारें १,६९,२१,०९६ गांसड्या केला आहे. सप्टेंबरमध्यें केलेल्या अंदाजापेक्षां हा अंदाज ३,६०,००० गांसड्यांनीं कमी आहे. १९५० सालीं एकूण १,००,१२,००० गांसड्या कापूस तयार झाला होता. गेल्या दहा वर्षांचें सरासरी उत्पादन १,२०,३०,००० गांसड्या आहे.

**पाणीपुरवठ्यासाठी मोटारी**—सौराष्ट्रांतील कित्येक खेड्यांतून पिण्याच्या पाण्याचाहि तुटवडा भासत आहे. अशा गांवांना मोटारींतून पाणीपुरवठा करण्यांत येणार आहे. सौराष्ट्र सरकारनें ८०० गॅलन पाणी नेऊं शकणाऱ्या ६० मोटारी ह्या कामासाठीं विकत घेण्याचें ठरविलें आहे. त्यासाठीं ७,९२,००० रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

**नव्या बोटीचें आगमन**— भारतांतील एका बोट कंपनीनें बेलजमकडून दोन मालवाहू बोटी घेण्याचें ठरविलें आहे. त्यांपैकीं 'सागरलक्ष्मी' नांवाची बोट नुकतीच मुंबई बंदरांत आली. बोटीचा जर्मन कप्तान आणि खलाशी 'आला.' ही दुसरी बोट मुंबईला आणण्यासाठीं विमानानें परत जाणार आहेत. ह्या दोन्ही बोटी मुंबई–कोलंबो मार्गावर येरझारा करतील.

**मध्यमवर्गाच्या रहाणीचें मान**—मद्रास सरकार मध्यमवर्गाच्या रहाणीच्या मानाची तपासणी करणार आहे. मद्रास शहरांतील ४० हजार मध्यमवर्गीय कुटुंबांपैकीं १,५०० कुटुंबांच्या घरगुती अंदाजपत्रकांची तपासणी करण्यांत येणार आहे. सध्यां रहाणीचा निर्देशांक फक्त गरीब वर्गापुरताच तयार करण्यांत येतो. मद्रास सरकार मध्यम वर्गाच्या रहाणीचा निर्देशांक तयार करणार आहे.

**सरसेनापति कारखानदार होणार**—भारताचे माजी सरसेनापति, फिल्ड मार्शल ऑचिनलेक हे पाकिस्तानमधील मिआनवाली जिल्ह्यांत सतरंज्यांचा कारखाना काढणार आहेत असें समजतें. कारखान्यांत एकूण १५,००,००० रुपये भांडवल गुंतविण्यांत येणार असून त्यापैकीं एक तृतीयांश ब्रिटिश नागरिक उभारणार आहेत.

**लोकरीची आयात कमी झाली**—उत्तर प्रदेशांत तिबेटकडून दरवर्षी सुमारें २५,००० मण लोकर आयात होत असते. परंतु चालू सालीं फक्त ८,००० मण लोकर आयात होण्याची शक्यता दिसत आहे. त्यापैकीं ३,००० मण लोकर आतांपर्यंत आली आहे. तिबेटमध्यें चिनी लष्कर आल्यापासून तिबेटी दलालांची ह्या व्यापारांतून हकालपट्टी करण्यांत आली आहे. त्यामुळें आयातींत घट झाली असावी असें म्हणतात.

**महागाई भत्त्यावर जप्ती आणतां येत नाहीं**—सोलापूरमधील एका गिरणी मजुरावर कर्जापायीं दिवाणी दावा लावण्यांत आला होता. त्याचा निकाल धनकोच्या बाजूनें लागल्यावर त्यानें सदर मजुराच्या महागाई भत्त्यावर हुकूमनामा बजावण्याचा प्रयत्न केला. परंतु महागाईभत्ता हा मूळ पगाराचाच भाग असल्यानें सिव्हिल प्रोसिजर कोडाच्या ६० कलमान्वयें त्यावर जप्ती आणतां येत नाहीं, असा निकाल कोर्टानें दिला.

**कारवारमध्यें अस्बेस्टॉस सांपडलें**—कारवार जिल्ह्यांतील कुमठा गांवापासून सहा मैलांवर अस्बेस्टॉस हें खनिज सांपडल्याचें वृत्त आहे. अस्बेस्टॉस काढण्यासाठी लागणारी व तें शुद्ध करण्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री खाणींत बसविण्यांत येत आहे. अस्बेस्टॉस सांपडूं शकणाऱ्या भागाचें क्षेत्रफळ सुमारें ८० एकर असावें, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**यांत्रिक हत्यारांचा कारखाना**—यांत्रिक हत्यारें तयार करण्याचा बंगलोर येथील कारखाना येत्या दोन वर्षांत सुरू होईल. कारखान्यांत संपूर्ण उत्पादन होऊं लागल्यावर दरवर्षी सुमारें ४ कोटी रुपयांचीं यांत्रिक हत्यारें तयार होऊं लागतील. कारखान्यासाठीं लागणारी यंत्रसामुग्री स्वित्झरलंडमधून मागविण्यांत येणार आहे.

**सोन्याच्या दागिन्यावर कर**—सोन्याच्या दागिन्यांत वापरण्यांत येणारें सोनें एकाच प्रतीचें रहावें म्हणून अशा दागिन्यांच्या घडणीवर कर बसविण्याचें राजस्थान सरकारनें ठरविलें आहे. दागिन्यांत वापरावयाच्या सोन्याचें व हिणकसाचें प्रमाण सरकार ठरवून देणार आहे. ह्या कराला 'कसोटी–कर' असें नांव देण्यांत येईल.

**भारताचा परदेशी व्यापार**—गेल्या सप्टेंबर महिन्यांत भारतानें खुष्कीच्या मार्गानें केलेल्या व्यापारांत १३·१२ कोटी रुपयांची प्रतिकूल तफावत दिसून आली. ह्या महिन्यांत अशी निर्यात १·८१ कोटी रुपयांची आणि आयात १४·९३ कोटी रुपयांची झाली.

## कोयना–काकडापाडा

### कांहीं नवीन माहिती

"अर्थ"च्या दिवाळी अंकांतील "कोयना उत्पादन (Lift-Irrigation) योजना कां भारगळली" या लेखांत काकडापाडा येथील धरण व कालवे मिळून योजनेची अंदाजी किंमत १२ कोटी रुपये हिंदी पंचवार्षिक योजनेंत दाखविली आहे असा उल्लेख आहे. १२ कोटींचे सुमारे २० कोटी, क्वचित् २५ कोटी होतील, असेंहि त्या लेखांत लिहिलें होतें.

चौकशी करतां असें कळतें कीं खुद्द धरणाचीच (Dam) किंमत २५ कोटी व पूर्ण योजनेची किंमत ४० कोटींच्या सुमारास जाईल. ५ कोटी रुपयांत एवढ्या मोठ्या जलसंचयास पुरेसा कालवा होणें अशक्य. त्या कालव्यास निदान दहा कोटी रुपये लागतील असा अंदाज आहे. एकंदर तापी योजनेस ५० कोटी रुपयांचे आसपास खर्च येईल असा अंदाज केल्यास फारशी चूक नाहीं.

दक्षी धरणाच्या बाबतींत धरणाचे बाबतींतच मतभिन्नता आल्यामुळें, घटप्रभा योजना २५ वर्षें पडून होती. धरण न बांधतां घुपदाळ जलोच्चकापासून कालवा काढण्याचें ठरवून त्यांतून मार्ग काढण्याचें श्रेय मंत्रिमंडळानें घेतलें. त्याच सरकारनें तापीचे बाबतींत तर "आधि शिखर मग पायारे" या शिकवणुकीनुसार, आधीं चाऱ्या (Distributaries) खणण्याचें काम हातीं घेऊन त्यामागून कनाल व जलोच्चक (Pick-up-weir) व द्रव्याची तरतूद झाल्यावर शेवटीं धरण, असा मार्ग स्वीकारला.

कोयना उत्पादन योजनेचा क्रम याच्या अगदीं विरुद्ध हें वरील माहितीवरून जास्तच स्पष्टपणें लक्षांत येईल. व्यवहारी व्यक्ती वा देश कसे वागतात तें पाहून त्यावरून महाराष्ट्रानें धडा शिकावा. नुसतीं मनगटें चावल्यानें काय होणार?

"नरसिंह"


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

सारखरेचा धंदा

महाराष्ट्रांत १० टक्के नफ्यानें चालवितां येतो
हें सिंडिकेटनें प्रत्यक्ष दाखविलें आहे

याशिवाय सिंडिकेटच्या ध्येयाप्रमाणें
(१) बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणें.
(२) बृहन्महाराष्ट्र भवन, दिल्ली.
अशी महाराष्ट्राची अल्प सेवा सिंडिकेटनें केली आहे.

—: ज्यांना शेअर घ्यावयाचे आहेत त्यांच्याकरितां :—

★ शेअर–विक्री सुरू आहे ★

— परंतु —

शेअरच घेतले पाहिजेत, ठेव स्वीकारणार नाहीं
असा आग्रह सिंडिकेटला करतां येणार नाहीं
६ टक्के व्याज दिलें तर इतर कोणाचें नुकसान होत नाहीं
मॅनेजिंग एजण्ट यांचें नफ्यावरील कमिशन मात्र शून्यापर्यंत कमी होतें

## ठेवींची मुदत १ वर्ष—व्याज ६ टक्के

शेअर व ठेवींचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

कॉमनवेल्थ बिल्डिंग, ९८०
सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड, पुणें २.
दि. ११ नोव्हेंबर १९५१.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एल्एल्. बी.,
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स.

# अर्थ

बुधवार, ता. २१ नोव्हेंबर, १९५१



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रिझर्व्ह बँकेच्या तपासणीचा अहवाल

### अनिष्ट प्रकारांस इष्ट प्रसिद्धि

कलकत्ता नॅशनल बँक लि. ह्या पश्चिम बंगालमधील प्रमुख शेड्यूल्ड बँक लि. वर ता. १४ मे, १९५१ रोजीं नोटीस बजावून रिझर्व्ह बँकेनें तिला त्या तारखेपासून पुढें नव्या ठेवी घेण्यास बंदी केली, हें वाचकांस माहीत आहेच. ह्याविषयीं कलकत्ता येथील कित्येक वृत्तपत्रांनीं बरीच तक्रार केली होती.

ठेवीदारांच्या हिताच्या दृष्टीनें रिझर्व्ह बँकेनें कलकत्ता नॅशनल बँकेस ही 'शिक्षा' केली, त्यापूर्वीं बँकिंग कंपनीज ॲक्टाप्रमाणें रिझर्व्ह बँकेनें आपला चौकशीचा अहवाल सरकारास सादर केला होता. त्या अहवालाचा कांहीं भाग सरकारनें २० ऑक्टोबरच्या गॅझिटांत प्रसिद्ध केला आहे. ॲक्टाच्या ३५ व्या कलमाच्या ५ व्या उपकलमाप्रमाणें अशा तऱ्हेचें प्रसिद्धीकरण सरकारवर बंधनकारक नाहीं. तरीपण, सरकारनें रिझर्व्ह बँकेच्या अहवालास ही प्रसिद्धी दिली आहे तिचा हेतु स्पष्ट आहे. एखाद्या बँकेविरुद्ध रिझर्व्ह बँकेनें व सरकारनें कांहीं उपाययोजना केली, तर कित्येक प्रसंगीं हितसंबंधी लोकांत गैरसमज निर्माण होतो आणि वैयक्तिक कारणांसाठीं संस्थेवर गदा आली, असा प्रचारहि केला जातो. परंतु, एखाद्या बँकेचा व्यवहार बंद करण्यास रिझर्व्ह बँकेस कोणकोणतीं कारणें झालीं, हें जर प्रसिद्ध झालें तर ह्या अपप्रचारास आळा बसण्यास मदत होईल. ह्या दृष्टीनें, प्रस्तुत प्रकरणीं सरकारनें घेतलेल्या निर्णयाचें स्वागतच केलें पाहिजे. बँकांचा गैरकारभार कोणत्या प्रकारचा असूं शकतो हें समजल्यानें बँकांच्या चालकांसहि त्यामुळें मार्गदर्शन होणार आहे.

रिझर्व्ह बँकेच्या प्रस्तुत अहवालांत ज्या कांहीं अनिष्ट बाबींचा उल्लेख करण्यांत आला आहे, त्यांतील कांहीं बाबी अशाः—

( १ ) कलकत्ता बँकेच्या गुंतवणुकीचे व कर्जाचे व्यवहार बहुदा चेअरमन करी आणि नंतर ते बोर्डापुढें किंवा तिच्या कमिटीपुढें मंजुरीसाठीं ठेवण्यांत येत असत. १७ लक्ष, ५२ हजार रुपयांच्या तीन प्रकरणांस अशा प्रकारची मंजुरी घेण्यांत आली नव्हती, असें रिझर्व्ह बँकेस आढळलें. (२) बँकेच्या भारतांतील ८० शाखांपैकीं २७ शाखा १९४९ मध्यें तोट्यांत चालू होत्या. बहुतेक शाखांत कित्येक गैरव्यवहार चालू होते. ( ३ ) बहुतेक शाखांतील करंट व सेव्हिंग्ज खात्यांतील शिलका जनरल लेजर्सशीं जुळत नव्हत्या. कित्येक शाखांत असा गोंधळ वर्षानुवर्षें चालू होता. ड्राफ्ट्स पेबेबल व पे ऑर्डर ह्यांच्या हिशेबाचीहि अशीच तऱ्हा होती. ( ४ ) कित्येक वर्षें असा प्रकार चालू होता ह्यावरून अंतर्गत हिशेब-तपासणीकडे दुर्लक्ष झालें असलें पाहिजे, आणि शेअर होल्डरांनीं नेमलेल्या ऑडिटरानें ह्या गोष्टी त्यांच्या नजरेस आणल्या नाहींत, हें स्पष्ट आहे. बाहेरील ऑडिटरानें केलेली तपासणी आवश्यक तेवढी उपयुक्त झालेली नाहीं. (५) बँकेनेंच उपलब्ध करून दिलेल्या रकमांतून तिचें भांडवल निर्माण करण्यांत आलें. निव्वळ नफ्यांतून पुरेसे रिझर्व्ह निर्माण करण्यांत आले नाहींत. बँकेच्या इमारतीची व इतर स्थावर मालमत्तेची हिशेबी किंमत वाढवून कॉंटिन्जन्सी फंडांत वाढ करावयाची व त्यांतून बुडीत कर्जें, घसारा, आलेलें नुकसान, इत्यादि लिहून टाकावयाचें असा प्रकार चालू होता. मालमत्तेची मूळ पडलेली किंमत २५½ लक्ष रुपये होती, ती १९४२-१९४९ ह्या मुदतींत ४१¾ लक्ष रुपयांनीं वाढविण्यांत आली. ( ६ ) १९५० सालीं बँकेस १·४४ लक्ष रु. नफा झाला, तरी तिनें डिव्हिडंड ई. फंडांतून रकमा घेऊन ६¼% दरानें ३·१३ लक्ष रु. डिव्हिडंड वाटलें. ( ७ ) कायद्याप्रमाणें आवश्यक त्या स्टॅच्युटरी शिलका बँकेनें रिझर्व्ह बँकेकडे बाळगल्या नाहींत. असे प्रसंग १९५० मध्यें कितीतरी झाले; त्याचप्रमाणें कॅश, बँकांतील शिलका व ट्रस्टी रोख्यांतील निर्वेध गुंतवणूक ह्यांची बेरीज ठेवींच्या २०% तरी पाहिजे, ती १७% च होती. ( ८ ) ज्यांना बाजाराचें 'कोटेशन' नाहीं असे शेअर्स व डिबेंचर्स ह्यांत जेवढी बँकेची गुंतवणूक होती, तिच्या ९८·१% म्हणजे १७·३० लक्ष रुपयांची गुंतवणूक ज्या कंपन्यांत चेअरमन व कांहीं डायरेक्टर्स ह्यांचे हितसंबंध होते, अशांतच होती. अशा शेअर्सची व डिबेंचर्सची वरचेवर खरेदी-विक्री झाली होती. अशा शेअर्सची व डिबेंचर्सची वरचेवर खरेदी-विक्री झाली म्हणजे बँकेस नुकसान येणारच. ( ९ ) ठेवींच्या ८७% इतकी मोठी रकम कर्जाऊ दिलेली होती. एकट्या कलकत्ता कचेरींतच एकूण २१७ लक्ष रुपयांच्या कर्जांपैकीं १६२ लक्ष रुपयांचीं कर्जें केंद्रित होतीं आणि त्यांपैकीं १२२ लक्ष रुपयांचीं कर्जें अनिष्ट अशीं आढळलीं.

कलकत्ता नॅशनल बँकेंत आढळलेल्या ह्या अनिष्ट बाबींस प्रसिद्धि दिल्यानें सर्वच बँकांचे ठेवीदार व चालक ह्यांस योग्य तें मार्गदर्शन होईल, अशी अपेक्षा आहे. प्रस्तुत कलकत्ता बँकेच्या ६०,००० ठेवीदारांना त्याचा कांहींहि प्रत्यक्ष उपयोग होणार नसला, तरी बँकिंग क्षेत्रांतील व्यवहार सुधारण्याच्या दृष्टीनें त्यांचेकडे पाहिलें पाहिजे. कलकत्ता नॅशनल बँकेच्या पुढील व्यवस्थेबाबत बँक ऑफ जयपूर लि. नें एक योजना तयार केली असून तिला कलकत्ता बँकेच्या ठेवीदारांनीं मान्यताहि दिली आहे. अर्थात् ह्या योजनेचा विचार करण्याचें येथें कर्तव्य नाहीं.

## चहाची लोकप्रियता वाढविण्याची खटपट

हिंदी चहाची लोकप्रियता वाढावी आणि त्याला अधिक मागणी यावी, म्हणून प्रयत्न करण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. सेंट्रल टी बोर्डातर्फे निरनिराळ्या देशांत चहाचीं आकर्षक दुकानें उघडण्याचें घाटत आहे. स्वित्झर्लंड, फ्रान्स आणि ऑस्ट्रेलिआ ह्या देशांतून तूर्त अशीं दुकानें उघडण्यांत येणार आहेत. त्याशिवाय स्वदेशांत चहाचा खप वाढविण्याचीही खटपट करण्यांत येणार आहे. ह्या कामांत ऑल इंडिआ वूमेन्स फूड कौन्सिल ह्या संस्थेची मदत टी बोर्ड घेणार आहे. वरील संस्थेतर्फे पूरक अन्नाचीं विश्रांतिगृहें दिल्ली, मुंबई आणि हैदराबाद अशा तीन मोठ्या शहरांतून उघडण्यांत आलीं आहेत. ह्याच विश्रांतिगृहांचा उपयोग चहाच्या प्रचारासाठीं करण्यांत येईल, असें समजतें. इतर शहरांतून अशीं उपाहारगृहें काढण्यासंबंधीं विचार चालू आहे. लवकरच मद्रास येथें असें एक उपाहारगृह खोलण्यांत येणार आहे. चहाची निर्गत करून भारताला डॉलर्सचें दुर्मिळ चलन मिळूं शकतें. भारताचें चहाचें एकूण उत्पादन सुमारें ६० कोटी पौंड आहे. त्यापैकीं ४५ कोटी पौंड चहा सध्या निर्यात करण्यांत येतो.

# कलमी कापूस

( लेसकः—श्री. ग. वा. देवधर, बी. ए., एम. एस्सी., अहमदाबाद. )

कापसाची लागवड भारतांत सहस्रों वर्षांपूर्वींपासून होत आली आहे. इतर देशांत कापसाची माहिती नव्हती, त्या वेळीं आपल्याकडे उत्तम कापड विणलें जात होतें. तसेंच अनेक रंगांचा कापूस देणारीं झाडें आपल्याकडे माहीत होतीं व त्यापासून काढलेल्या सुताचें नाना प्रकारचें कापड बनत असे. ढाक्क्याची मलमल सर्वांना ऐकून तरी माहीत आहेच. त्या मलमलींतलें सूत सरासरी २४० नंबरचें व सर्वोत्तम ४२५ नंबरचें असें व तींत वापरलेल्या कापसाचा धागा ( staple ) १·०, १·१ इंच लांबीचा असे. तो कापूस यंत्रानें त्वरित वटविला जाण्याजोगा नसल्यामुळें आधुनिक यंत्रयुगाच्या स्पर्धेत मागें पडला व इतर कापसाच्या जाती पुढें आल्या. सध्यां अशी स्थिति आहे कीं भारतांत निदान पांच सहस्र वर्षांपूर्वींपासून कापूस माहीत असून सुद्धां जगांतील अत्युत्तम कापूस अमेरिकेंत व आफ्रिकेंत होतो.

कापसाचें झाड मूळ रानटी होय. रानटी झाडाच्या बोंडांत कापूस अतिशय कमी किंवा नाहींच, बियांना घट्ट चिकटलेला, अगदीं आखूड व कांहींसा लांब असल्यास बिनपिळाचा, सूत काढण्यास अयोग्य असा असतो. परंतु निसर्गाच्या अहेतुक व मनुष्याच्या सहेतुक योजनेनें रानटी झाडांतून नवे नवे उपयुक्त प्रकार अस्तित्वांत आले. चांगला कापूस शक्य तितक्या लांब धाग्याचा, बियापासून सुलभतेनें दूर करितां येण्याजोगा, पिळाचा व शुभ्र असला पाहिजे. रानटी कापसाचीं झाडें बहुधा बहुवर्षायु असतात. लागवडीच्या कापसाचीं झाडें—अगर झुडपें—हंगामी पीक देणारीं असावींत. अशा कापसाचें पीक कोरडी हवा (drought) व हिमपात ( frost ) यांना टाळून पावसाळ्यांत काढतां येतें व कीटक निरोधहि ( pest control ) चांगला करितां येतो. म्हणून रानटी जातींच्या संकरानें उत्पन्न झालेल्या नव्या झाडांतून निवड करून हव्या असलेल्या विविक्षित गुणधर्मांचा कापूस पिढ्यान् पिढ्या देणाऱ्या जाती ( strains ) सिद्ध करण्यांत येतात. याच पद्धतीनें सी आयलंड् व इजिप्शिअन् कापसाच्या जाती निर्माण झाल्या आहेत.

सी आयलंड किंवा इजिप्शिअन् कापसाचें बीं आपल्या इकडे लावल्यास पहिलें पीक लांब धाग्याचें येतें. परंतु प्रत्येक पुढच्या पिढींत धागा आखूड आखूड होत जाऊन तीन-चार पिढ्यांत तो अगदींच साधारण होऊन जातो असा अनुभव आहे.

वनस्पतींतील चांगले गुण टिकविण्यासाठीं त्यांचीं कलमें करण्याचा प्रघात आहे. ती पद्धत कापसासाठीं कां उपयोगांत आणूं नये असा प्रश्न उपस्थित होण्यासारखा आहे. कलमासाठी बहुवर्षायु झाडांची निवड केल्यास एक झाड पांच ते सात वर्षें टिकूं शकेल व तेवढ्या अवधींत बाराएक पिकें निघूं शकतील. त्यामुळें सुरवातीच्या त्रासाचा व व्ययाचा मोबदला नंतरच्या कमी व्ययानें व उत्तम कापसाला येणाऱ्या अधिक मोलानें मिळेल. कलमी कापसाच्या बियांपासून चांगला कापूस मिळणें शक्य आहे. तसें झाल्यास एक एकर कलमी कापसापासून एका हंगामांत येणाऱ्या बियांतून उत्तम प्रतीच्या कापसाची लागवड अदमासें पांचशें एकर व पुन्हा त्यांपासून दुसऱ्या प्रतीच्या पण सध्यां होणाऱ्या कापसापेक्षां बऱ्याच वरच्या प्रतीच्या कापसाची लागवड अदमासें ५०० × ५०० एकर होऊं शकेल. ही बिनकलमी झाडांची लागवड हंगामी होऊं शकेल, कीटक निरोधनाचा विचार सध्यां सोडून दिल्यास हिमाची भीति नसलेले व वर्षभर पाण्याची सोय असलेले प्रदेश कलमी कापसाच्या लागवडीसाठीं शोधून काढणें कठिण नाहीं.

वरीलप्रमाणें विचार करून मीं प्रयोग करण्याचें ठरविलें. माझ्या एका मित्राकडून सी आयलंड्—जगांतील सर्वांत लांब धाग्याच्या—कापसाचें बीं मला मिळालें. तें पेरून आलेल्या झाडाचें कलम देवकापसाच्या झाडावर केलें. कलमी झाडाला आलेला कापूस माझ्या कांहीं तज्ज्ञ मित्रांस दाखवितां, तो मूळ सी आयलंड कापसाइतकाच चांगला असल्याचा त्यांनीं अभिप्राय दिला.

यजमान झाडाची एकादी फांदी राहून गेल्यास त्यापासून निघणारा कापूस व उपरी झाडाचा कापूस एकमेकांत मिसळून प्रत बिघडूं नये म्हणून यजमान झाड रानटी असावें असा विचार केला. असें झाड सौराष्ट्रांत वाढतें व त्याला जंगली बोंण म्हणतात. त्याचें बीं मला राजकोट येथून मिळालें. त्यापासून रोपें करून त्यांवर सी आयलंडचीं कलमें केलीं. त्यांवर नुकतींच बोंडें धरलीं आहेत.

या विषयासंबंधीं आणखी पुष्कळ प्रयोग करावयास पाहिजेत त्यांपैकीं कांहीं चालू केलेले आहेत.

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.
( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१९,४८५ |
| खेळतें भांडवल | रु. ७५,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

## पोस्ट खात्याचा शताब्दि महोत्सव

भारतीय पोस्टऑफिसचा आणि तिकिटांचा शताब्दि महोत्सव १९५४ मध्यें साजरा करण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. भारतामधील पोस्टखात्याचा इतिहास खालीलप्रमाणें आहे.

मध्यपूर्व आणि दूर पूर्व ह्या दोन्ही भूभागांतील पोस्ट खात्यांना सहाय्यक म्हणून भारताचें महत्त्व बरेंच जुनें आहे. अरबस्थान आणि इराणमधील हिंदी पोस्टऑफिसें निदान ८० वर्षांचीं तरी जुनीं आहेत. भारतांत ईस्ट इंडिआ कंपनीनें व्यापाराच्या निमित्तानें आपलें बस्तान बसविल्यावर टपाल नेण्यासाठी प्रथम तिनें पूर्वीच्याच रनर्सचा उपयोग केला. परंतु व्यापाराच्या वृद्धीबरोबर आपले स्वतःचे पगारी 'रनर्स' ठेवणें कंपनीला जरूर पडलें. पोस्ट-मास्टर जनरल हा हुद्दा ३१ मार्च १७७४ रोजीं निर्माण करण्यांत आला. पोस्टाचा उपयोग खाजगी व्यक्तींना करू देण्यांत येई. त्यासाठीं २ आण्यांपासून ५ रुपयांपर्यंत आकार पडे. भारतीय सरकारनें खाजगी रीतीनें टपालाची ने-आण करण्यास बंदी केली; तरी १८५४ पर्यंत अशा सोयी उपलब्ध होत्या. त्या सालीं प्रत्येक पत्रामागें अर्धा आणा घेऊन पोस्टाची सोय सर्व जनतेला उपलब्ध करून देण्यांत आली. कॉर्नवॉलिस आणि हेस्टिंग्ज ह्यांच्या कारकिर्दीत कलकत्त्याहून इंग्लंडला पाठविलेल्या पत्राचें उत्तर येण्यास एक वर्ष लागे. कारण कंपनीच्या जहाजांना केप ऑफ गुड होपला वळसा घालून जावें लागे. पुढें शिडाच्या जहाजांची जागा आगबोटींनीं घेतल्यावर मुंबईहून एक बोट सुएझला जाई. तेथून इजिप्तच्या सरकारच्या परवानगीनें बोटींतील टपाल अलेक्झांड्रियापर्यंत खुष्कीनें जाई. नंतर दुसऱ्या बोटीनें अलेक्झांड्रियापासून मार्सेय-कॅले-डोव्हर ह्या मार्गानें इंग्लंडला जाई. ह्या जमिनीवरील मार्गानें टपालाची ने-आण लवकर होऊं लागली. १८३६ मध्यें मुंबईचें पत्र लंडनला पोंचण्यास १०० दिवस लागत असत. भारतामधील पहिली पोस्टाचीं तिकिटें प्रॉव्हिन्शिअल कमिशनरच्या अधिकाराखालीं काढण्यांत आलीं होतीं. १८५१ मध्यें सिंधमध्यें पोस्टाच्या दळणवळणाबाबत कांहीं सुधारणा करण्यांत आल्या. परंतु ह्या सुधारणांमुळें सरकारला फार खर्च येईल म्हणून मुंबई सरकारनें सिंधच्या कमिशनरला 'पेनी पोस्ट' पद्धत अवलंबविण्याविषयीं सुचविलें. त्या सूचनेचा विचार होऊन 'शिंदि डॉक' ह्या नांवानें प्रसिद्ध असलेलीं पोस्टाचीं तिकिटें काढण्यांत आलीं. हींच भारतामधील पहिलीं पोस्टाचीं तिकिटें. सिंधमध्यें पोस्टाचीं तिकिटें वापरलीं जातांच सर्व भारतांतहि अशीं तिकिटें वापरण्याचा प्रश्न पुढें आला, आणि कलकत्ता येथील स्टँप ऑफिसमध्यें तीं छापण्यांत आलीं. त्यानंतरचीं तिकिटें मात्र इंग्लंडमध्यें छापलीं गेलीं. ह्या तिकिटांवर 'ईस्ट इंडिआ पोस्टेज' असे शब्द आहेत. त्यानंतर 'इंडिआ पोस्टेज' असे शब्द आले. भारत स्वतंत्र होण्यापूर्वी तिकिटांवर इंग्लंडच्या राजे व राण्या ह्यांच्या प्रतिमा असत. भारतीय सैन्य लष्करी कामगिरीवर परदेशीं गेल्याच्या कांहीं प्रसंगीं मुद्दाम वेगळीं तिकिटें काढण्यांत आलीं होतीं आणि तीं सैनिकांच्या टपालासाठी वापरण्यांत येत असत. ग्वाल्हेर, पतिआळा, कोचीन, हैद्राबाद, जयपूर, त्रावणकोर, इत्यादि संस्थानांना स्वतंत्र पोस्टाचीं तिकिटें काढण्याची परवानगी होती. स्वतंत्र भारतांत मात्र अशा तिकिटांना परवानगी नाहीं.


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)

शाखा : ३, ५, १० वर्षे सिल्व्हर
१ दादर ज्युबिली सर्टिफिकिटें
२ माहीम दर ९३-८, ८७-८, ७५ अनुक्रमें.
३ बेळगांव हेड ऑफिस-गिरगांव, मुंबई
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.


## ऑस्ट्रेलिआच्या आर्थिक घडामोडी

कॉलिन क्लार्क ह्या ऑस्ट्रेलिअन अर्थशास्त्रज्ञानें 'लुकिंग अहेड' ह्या नियतकालिकांत, आस्ट्रेलिआच्या आर्थिक परिस्थितीविषयीं कांहीं विचार व्यक्त केले आहेत. हें नियतकालिक कॉमनवेल्थ बँकेतर्फे प्रसिद्ध होत असतें. ऑस्ट्रेलिआंतील वाढलेल्या किंमती लक्षांत घेऊन सध्यां त्या देशाची आयात १९३८-३९ च्या मानानें ९० टक्के अधिक वाढली असल्याचें त्यांनीं वरील लेखांत नमूद केलें आहे. आस्ट्रेलिआ सर्व दृष्टीनें स्वयंपूर्ण करण्याच्या कल्पना स्वप्नवत ठरल्या आहेत. १९३८-३९ शीं तुलना करतां शेतीवर राबणाऱ्या मजुरांच्या संख्येंत घट झालेली आढळून येते. त्या सालीं अशा मजुरांची संख्या ५,२०,००० होती, ती आतां ४,५०,००० इतकी झाली आहे. कारखान्यांत काम करणाऱ्या मजुरांची संख्या ५,४२,००० वरून ८,८९,००० पर्यंत वाढली आहे. शेतमजुरांच्या उत्पादनक्षमतेंत ५० टक्के वाढ झाल्याचें दिसतें. कारखान्यांच्या मजुरांची उत्पादनक्षमता वाढली किंवा नाहीं ह्या विषयीं मात्र शंका आहे. १९३८-३९ सालीं ऑस्ट्रेलिआ जी आयात करत असे, तिला २,९०,००० मजुरांची श्रमशक्ति खर्ची घालावी लागत असे. आज मात्र ५,५०,००० मजुरांच्या श्रमशक्तीनें तयार झालेला माल ऑस्ट्रेलिआ आयात करीत आहे. १९३८-३९ सालीं देशाला जो पक्का माल लागत असे त्यापैकीं ३५ टक्के माल आयात करण्यांत येत असे. हल्लीं ३८ टक्के मालाची आयात करावी लागते. परदेशीय व्यापारांत आज ऑस्ट्रेलिआला अतिशय अनुकूल परिस्थिति आहे. १९३८-३९ सालीं विवक्षित माल निर्यात केला असतां जितकी आयात करतां येत असे, त्याच्यापेक्षां दुप्पट मालाची आयात आज तितकाच माल निर्यात करून करतां येते. आस्ट्रेलिआंत शेती अगर तद्विषयक कामांत राबणाऱ्यांची संख्या कमी झाली असली तरी त्यांची उत्पादनक्षमता वाढलेली आहे, हें लक्षांत घेण्यासारखें आहे. कारखान्यांची उत्पादनक्षमता ही अखेर शेतीच्या मालावर अवलंबून असल्यामुळें कारखान्यांच्या मजुरांत झालेली वाढ आर्थिक विकासाला मारक ठरण्याचा फारसा संभव नाहीं.

**अमेरिकेंत माल उत्पादनांत कपात**—पुढील वर्षाच्या जानेवारीपासून अमेरिकेंत नागरिकांना लागणाऱ्या रोजच्या वस्तूंच्या उत्पादनांत १० टक्के कपात करण्यांत येणार आहे. शस्त्रास्त्रांच्या निर्मितींतील वाढ आतां जोरानें होऊं लागल्यामुळें संरक्षण खात्यानेंच वरील कपात सुचविली आहे. १९५२ सालच्या पहिल्या सहा महिन्यांत दुर्मिळ खनिजांचा तुटवडा चांगलाच जाणवेल, असाहि अंदाज करण्यांत आला आहे.

**भारी किंमतीचा हिरा सांपडला**—प्रिटोरिआ (दक्षिण आफ्रिका) येथील एका हिऱ्याच्या खाणींत एक फार मौल्यवान हिरा नुकताच सांपडला आहे. ह्या हिऱ्याची किंमत सुमारें १,००,००० ते १,५०,००० पौंड असावी असा अंदाज करण्यांत आला आहे. तो २॥ इंच लांब, १॥ इंच रुंद आणि ½ इंच जाड आहे. त्याचें वजन २८३½ कॅरट इतकें आहे.

### दि नाणेघाट फ्युनिक्युलर ट्रॅम्वे अँड ट्रॅन्स्पोर्ट कं. लि.

वरील कंपनीची ट्रॅम्वेची संपूर्ण यंत्रसामुग्री कंपनीचे ताब्यांत आली आहे. ट्रॅम्वे लाईनचे नकाशे तयार झाले आहेत. नाणेघाट योजनेकरितां लागणारा एकंदर खर्च अंदाजें २६ लक्ष रु. असून योजना पूर्ण करण्यास आणखी १४ लक्ष रुपयांची आवश्यकता आहे. पैशाचे अभावीं ऑक्टोबर, १९५० मध्यें पुनः कामास सुरुवात करतां आली नाहीं. सरकारकडून लवकर मदत मिळण्याचा संभव दिसत नसल्यामुळें योजना पूर्ण करण्याच्या हेतूनें ६% व्याजाचीं ८ लक्ष रु. चीं डिबेंचर्स दोन हप्त्यांमध्यें काढावयाचें ठरलें. तूर्त ५ लक्ष रु. चीं १० वर्षें मुदतीचीं फर्स्ट मॉर्टगेज डिबेंचर्स काढण्यास ट्रम्वे ऑर्डरप्रमाणें सरकारी परवानगी मिळाली आहे. मॅनेजिंग डायरेक्टर श्री. शं. गो. नरवणे ह्यांनीं कामाबद्दल कांहींहि वेतन घेतलें नाहीं, डायरेक्टर्सपैकीं कोणीहि फी घेतली नाहीं, इतकेंच नव्हे तर बाहेरगांवाहून येण्याऱ्या डायरेक्टर्सनीं प्रवासखर्चहि घेतला नाहीं. भागीदारांनीं व त्यांच्या मित्रमंडळींनीं डिबेंचर्समध्यें रकमा गुंतवून योजना पुरी करण्यास हातभार लावावा अशी बोर्डाची विनंति आहे. कंपनीचें वसूल भांडवल ११,१७,४८५ रु. असून एकूण ताळेबंद ११,६२,१८२ रु. चा आहे. (चेअरमन धोंडो कृष्ण साठे. मॅ. डायरेक्टर: शंकर गोविंद नरवणे, एम. ई. कोलंबिया)

### नव्या बँक ट्रायब्यूनलचे चेअरमन

बँका व त्यांचे नोकर ह्यांचेमधील तंट्यांबाबतचा सेन निवाडा सुप्रीम कोर्टानें रद्द करविल्यानंतर मध्यवर्ती सरकारनें गेल्या जुलै मध्यें दिवाटिया ट्रायब्यूनलची नेमणूक केली होती. ह्या ट्रायब्यूनलच्या सभासदांविरुद्ध मुंबई हायकोर्टांत एका बँक-नोकरानें अर्ज केला, तेव्हां ट्रायब्यूनलच्या सर्व सभासदांनीं राजीनामा दिला. आतां मध्यवर्ती सरकार नवें ट्रायब्यूनल नेमीत आहे, त्याचे अध्यक्षस्थानीं श्री. एस. पंचपगेश शास्त्री ह्यांची नेमणूक झाली आहे. इतर दोन सभासदांची नेमणूक लवकरच जाहीर होईल.

सर्वांत जास्त दाट लोकवस्तीचा देश—हॉलंडची सध्याची लोकसंख्या १,०२,८६,२५० असून तो सर्वांत दाट लोकवस्ती असलेला देश आहे असें जाहीर करण्यांत आलें आहे. दर चौरस मैलागणिक ७६६ लोक, असें हॉलंडमधील प्रमाण पडतें. इंग्लंडचें हें प्रमाण ७४२ आहे आणि जपानचें ५७८ आहे.

ब्रिटनमधील अपघातांचीं कारणें—ब्रिटनमधील रस्त्यावर रात्रीं जे अपघात होतात त्यापैकीं ९ टके अपघात वाहनांच्या मागें असणाऱ्या दिव्यांच्या सदोषतेमुळें होतात असें आढळून आलें आहे. हे दिवे अमेरिकेप्रमाणें अधिक तेजस्वी ठेवल्यास अपघात कमी होतील असा तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. वाहनाच्या पाठीमागें एकाऐवजीं दोन दिवे दोन फूट अंतरानें लावले तरीहि अपघात कमी होतील.

अमेरिकन कादंबरीकाराची मालमत्ता—सुप्रसिद्ध अमेरिकन कादंबरीकार सिंक्लेअर लुइस गेल्या जानेवारी महिन्यांत कालवश झाले. त्यांची मालमत्ता इतर सुप्रसिद्ध ग्रंथकारांच्या मानानें फारच थोडी असल्याचें आढळून आलें त्यांनीं फक्त ९३,५०० पौंडांची मालमत्ता मागें ठेवली. जॉर्ज बर्नार्ड शॉ ह्यांनीं सुमारें ३,६७,२३३ पौंडांची जिंदगी ठेवली होती.


**ठेवी स्वीकारण्यांत येतात**

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७७८ तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay

**बँक ऑफ पूना, लिमिटेड.**

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

— संचालक मंडळ —

१ श्री. मुरलीधर चतुरभुज लोया, (चेअरमन)
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., व्हा. चेअरमन
३ डॉ. ना. भि. परुळेकर, संचालक 'सकाळ'
४ श्री. फ्रामजी पेस्तनजी पोचा, सीड्स मर्चंट
५ श्री. लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी, बँकर्स व मर्चंट सोलापूर
६ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी, व्यापारी
७ श्री. गणपतराव काळूराम नाईक, बी. एस्सी., बी. ई., एलएल. बी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याची सोय.

ठेवींवर व्याज—

चालू खातें अर्धा टक्का, सेव्हिंग्ज १॥ टके,
मुदत ठेव १ वर्ष २॥ टके, ३ वर्षें ३ टके.

शाखा स्थानिक—(१) भवानी पेठ, व (२) सदाशिव पेठ, पुणें.
बाहेरगांवीं—सोलापूर, सांगली.
मुख्य ऑफिस:—४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

गो. गं. साठे.
मॅनेजर.



## रिझर्व्ह बँकेची दुहेरी उपाययोजना

### नवा बँक रेट अधिक प्रभावी होणार

गेल्या मोसमांत व्यापारी बँकांनीं दिलेल्या कर्जाची रक्कम ५८६ कोटी रुपयांवर गेली. युद्धापूर्वी किंवा त्यानंतरहि कोणत्याहि वर्षी इतकीं कर्जे देण्यांत आलेलीं नव्हतीं. रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांनीं ह्याबाबत अर्थमंत्र्यांशीं चर्चा केली आणि गेल्या ऑगस्टमध्येंच बोर्डाच्या कमिटीला गेलीं १२ वर्षें अंमलांत असलेला बँकरेट ३% चा ३½% करण्याची शिफारस करण्याचें त्यांनीं ठरविलें. ऑक्टोबरच्या प्रारंभीं मोसमांतील अपेक्षित मोठी कर्जमागणी आली नाहीं, म्हणून त्याबाबत निर्णय पुढें ढकलला. बुधवार, ता. १४ च्या बोर्डाच्या सभेनें बँकरेट ३% चा ३½% करण्याचें अखेर ठरविलें.

मोसमामध्यें कर्जे देण्यासाठीं ज्यास्त रकमा लागल्या, म्हणजे शेड्यूल्ड बँका रिझर्व्ह बँकेस सरकारी रोखे विकून पैसे उभारीत. चालू मोसमांत अशा प्रकारें सरकारी रोखे सामान्यतः विकत घेतले जाणार नाहींत असें रिझर्व्ह बँकेनें जाहीर केलें आहे. चालू बँक रेटप्रमाणें बँकांनीं जरूर तर रिझर्व्ह बँक कायद्याच्या १७ (४) (अ) कलमाप्रमाणें तिचेकडून कर्जे घ्यावींत.

रिझर्व्ह बँकेकडून जुन्या (३%) दरानें कर्ज घेण्यापेक्षा सरकारी रोखे विकणें शेड्यूल्ड बँकांना पूर्वी फायद्याचें वाटत असे. आतां सरकारी रोखे विकत घेण्याचें रिझर्व्ह बँकेनें बंद केल्यानें व बँक रेट ३½% झाल्यानें बँकांस रोखे विकून आवाक्याबाहेर कर्ज देण्याची असलेली सोय नष्ट होणार आहे. बँक रेट वाढल्यामुळें कर्जे घेणें महाग पडतें व त्यामुळें जरूर त्या कारणांसाठीं आवश्यक तेवढेंच कर्ज घेण्याची प्रवृत्ति निर्माण होते, साठे करून सट्टे करण्यास प्रोत्साहन मिळत नाहीं, आणि किंमती उतरण्यास पोषक असें वातावरण निर्माण होऊं शकतें. बँक रेट वाढल्याकारणानें, बाजारांतील प्रचलित व्याजाच्या दराशीं बँक रेट जास्त मिळता झाला आहे.

### "ओपन मार्केट ऑपरेशन्स" स्थगित

भारतांतील आर्थिक व्यवहार बँकिंग क्षेत्राच्या कक्षेत पूर्णपणें आलेले नाहींत. त्या कारणानें बँक रेट ब्रिटनमध्यें जितका प्रभावी होतो, तितका तो होऊंच शकत नाहीं अशी परिस्थिति आहे. रिझर्व्ह बँकेच्या "ओपन मार्केट ऑपरेशन्स" च्या पद्धतीमुळें म्हणजे मोसमांत बँकांना जरूर पडेल त्यावेळीं कांहीं किमान किंमतीस सरकारी रोखे विकत घेण्याच्या व मोसम संपल्यावर विकण्याच्या रिझर्व्ह बँकेच्या पद्धतीमुळेंहि बँक रेट बाजूलाच रहातो. ही परिस्थिति विचारांत घेऊन, रिझर्व्ह बँकेनें आतां दुहेरी उपाययोजना केली आहे; बँक रेट वाढविला असून "ओपन मार्केट ऑपरेशन्स" हि बंद ठेवलीं आहेत. त्यामुळें बँकांना पैशाची जरूरी लागली कीं त्यांना बँकरेटनेंच रिझर्व्ह बँकेकडून पैसा घ्यावा लागेल. बँका आपल्या कर्जदारांकडूनहि ज्यास्त दरानें व्याज घेणार आणि एकूण कर्जेहि कमी करणार हें उघड आहे. व्यापारी वर्गास पूर्ववत् पैशाचा पुरवठा होणार नाहीं. सरकारी कर्जरोख्यांची किंमत आणखी खालीं जाणार, हें अपरिहार्यच आहे.

### नव्या धोरणास प्रारंभ समजावयाचा काय?

मुंबई–कलकत्ता सारख्या प्रमुख केंद्रांतील हुंड्यांचे दर बँकरेटपेक्षां कितीतरी जास्त असल्याकारणानें, अर्धा टक्का बँकरेट वाढल्यानें विशेष फरक पडेल काय? बँकरेटबद्दलच्या नव्या धोरणानें सरकारी रोख्यांच्या किंमती व सरकारी कर्ज उभारणीचे दर ह्यांवर महत्त्वाचा परिणाम होण्याचा संभव आहे. रिझर्व्ह बँकेचा सरकारी रोख्यांस असलेला पाठिंबा नाहींसा झाल्यावर त्यांच्या किंमती ज्या पातळीवर उतरतील, ती पातळी गुंतवणुकीच्या परिस्थितीची खरी निदर्शक होईल आणि नव्या कर्ज उभारणीच्या अटी त्याप्रमाणें ठरवाव्या लागतील. इतके दिवस सरकार स्वस्त पैशाच्या धोरणास चिकटून राहिलें होतें आणि त्यामुळें त्याला कर्ज उभारणीचेबाबत अपेक्षित यश मिळूं शकलें नाहीं. युद्धकाळांत उभारलेल्या कर्जाची परत फेड आतां लवकरच सुरू होईल व नव्या पंचवार्षिक योजनांसाठींहि मोठीं कर्जे उभारावीं लागतील. हा पैसा जमविण्यासाठीं व्याजाचें दरहि अनकूल असावे लागतील. ह्या दृष्टीनेंच बँकरेटचें धोरण आखलें गेलें असलें पाहिजे.

### विमा कंपन्यांना नवा बँक रेट फायदेशीर?

बँकरेटमधील वाढ आयुर्विमा कंपन्यांना फायद्याची होईल, असें मत ओरिएंटल विमा कं. चे मॅनेजर श्री. वैद्यनाथन ह्यांनीं व्यक्त केलें आहे. सध्या गुंतवलेल्या फंडाची किंमत उतरेल हें खरें आहे. परंतु, अशा रोख्यांवर पडणारें व्याज ज्यास्त दराचें होणार असल्यानें मूल्यमापनास अधिक मोठा व्याजाचा दर गृहीत धरता येईल व त्यामुळें परिस्थिति सुधारलेलीच आढळून येईल. मूल्यमापनासाठीं मोठा व्याजाचा दर गृहीत धरला, म्हणजे विमेदारांचें देणें हिशेबांत निघेल तें कमीच निघेल हा फायदा आहे. चालू कामाचे पुढें मिळणारे हप्ते व नव्या कामाचे हप्ते हे चांगल्या व्याजाच्या दरानें गुंतविता येतील. अर्थात, हें घडून येण्यास कांहीं वर्षें लागतील. मंदीचीं लक्षणें दिसूं लागलीं आहेत; तेव्हां कंपन्यांनीं अनिष्ट स्पर्धेच्या आहारीं मात्र जातां कामा नये.

### इतर देशांतीलहि बँकरेट वाढला आहे

वेगवेगळ्या देशांत बँकरेटमध्यें गेल्या कांहीं महिन्यांत कशी वाढ झाली आहे, हें खालील तक्ता दर्शवितोः—

| देशाची सेंट्रल बँक | डिस्काऊंट (बँक) रेट | |
|---|---|---|
| | १९४९ अखेर | चालू |
| बेल्जियम | ३¼ | ३¾ |
| कॅनडा | १½ | २ |
| डेन्मार्क | ३½ | ५ |
| फिनलंड | ५¾ | ७¾ |
| प. जर्मनी | ४ | ६ |
| नेदर्लंडस् | २½ | ४ |
| स्वीडन | २½ | ३ |
| युनायटेड स्टेटस् | १½ | १¾ |
| ग्रेट ब्रिटन | २ | २½ |
| भारत | ३ | ३½ |

**सिनेमांत काम करणाऱ्या मांजराचा विमा**—छुबार्ब ह्या नांवाचें एक प्रसिद्ध मांजर सिनेमांत काम करीत असतें. ह्या चतुष्पाद नटाला आपल्या कामानिमित्त सुमारें १०,००० मैल प्रवास करण्याचा प्रसंग आला असतां लंडनमधील प्रसिद्ध लॉइड ह्या कंपनीनें त्याचा विमा स्वीकारला. विमा-करारांतील अटीप्रमाणें वैमानिक अपघात, कुत्र्यापासून इजा अगर मृत्यु अगर लत्ताप्रहार इत्यादि बद्दलची जोखीम कंपनीनें घेतली आहे. मांजराचा मुक्काम फक्त उत्तम प्रतीच्या हॉटेल्समधूनच करण्याचें कलमहि करारांत आहे.

### मध्यवर्ती सरकारनें केलेली बचत

गेल्या बारा महिन्यांत मध्यवर्ती सरकारनें १,००० रुपयांच्यावर मासिक पगार असलेल्या बऱ्याचशा जागा रद्द केल्या आणि सुमारें ४,५०,००० रुपयांची बचत केली. एकूण १० जागा अजिबात रद्द करण्यांत आल्या, एक भरण्यांत आली नाहीं आणि एका जागेचा पगार कमी करण्यांत आला. सर्वांत अधिक बचत रेल्वे खात्यांतील दोन जागा रद्द करून करण्यांत आली. ह्या दोन जागांचा वार्षिक पगारच १, २४,००० रुपये होता. इतर खात्यांतील बचत पुढील प्रमाणें आहे. व्यापार व उद्योग खातें दोन जागा रद्द, बचत ७५,००० रुपये परराष्ट्र खातें एक जागा भरली नाहीं, बचत, ३३,००० रुपये फडणिशी खातें एक जागा रद्द, बचत ४३००० रुपये रेव्हेन्यू खातें, एक जागा रद्द, बचत ४,५०० रुपये. अन्न व शेतकी खातें-दोन जागा रद्द, बचत ६६,००० रुपये. संस्थानी खातें दोन जागा रद्द, बचत ८४,००० रुपये. मुख्य-प्रधानाची कचेरी एका जागेचा पगार कमी केला, बचत २१,००० रुपये.

### ब्रिटिश मोटारींना अमेरिकेंत मागणी

ब्रिटिश बनावटीच्या गाड्यांना हल्ली अमेरिकेंत अधिक मागणी येऊं लागली असल्याचें ब्रिटिश मोटारधंद्याचे अमेरिकेंतील प्रतिनिधी, सर विल्यम वेल्श ह्यांनीं एका प्रसंगीं सांगितलें. गेल्या वर्षी अमेरिकेंत १९,९९७ पौंड किंमतीच्या मोटारी खपल्या होत्या. परंतु ह्या वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांतच खपांत दोनशे टक्क्यांनीं वाढ झाली असल्याचें ते म्हणाले.

### मद्रास राज्यांत पावर अल्कोहल

मद्रास सरकारनें राज्यांत पॉवर अल्कोहल तयार करणारे चार कारखाने काढण्यास परवानगी दिली होती. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कारण, उसाच्या रसाच्या ज्या मळीपासुन पॉवर अल्कोहल तयार करण्यांत येतें, त्या मळीच्या किंमती खुपच वाढल्या त्यामुळें इतकी किंमत देऊन पॉवर अल्कोहल तयार करणें आर्थिक दृष्ट्या शक्य झालें नाहीं. ही माहिती मद्रास सरकारतर्फेच अधिकृत म्हणून जाहीर करण्यांत आली आहे.

### कांडला बंदराचा विकास

कांडला बंदराच्या विकासासाठीं १० कोटी रुपये खर्च येणार आहे. बंदरासंबंधींचें प्राथमिक काम आतां पूर्ण झालें असून प्रत्यक्ष बंदराच्या बांधणीसाठी टेंडर्स मागविण्यांत आलीं आहेत. कांडला-दिसा रेल्वे मार्गहि पुढील वर्षाच्या अखेरीस पूर्ण होईल. बंदर पूर्ण झाल्यावर त्यामधून दरवर्षी ३० लाख टन वजनाच्या मालाची ने-आण होईल. महत्त्वाच्या दृष्टीनें तें मद्रासच्या खालोखाल येईल.

### आतां प्लॅस्टिकचीं विमानें !

ब्रिटनमध्यें फार्नबरो येथें नुकतेंच एक विमानांचें प्रदर्शन भरलें होतें. सदर प्रदर्शनांत विमानाचा एक प्लॅस्टिकचा पंख नमुन्यादाखल ठेवण्यांत आला होता. ब्रिटिश सरकारच्या पुरवठा खात्याचा एक अधिकारी ह्यासंबंधीं बोलतांना असें म्हणाला कीं, कदाचित् दोन वर्षांत संबंध विमानच प्लॅस्टिकचें बनवितां येईल. तसें झाल्यास विमानांच्या निर्मितीचा खर्च निम्म्यावर येईल आणि दुर्मिळ धातूंची टंचाई फारशी भासणार नाहीं.


स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

पॅलेस स्ट्रीट, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व वार्शी.

ता. ३०-६-५१ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४३,७६० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,६५,००० |
| ठेवी | रु. | ६७,११,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७९,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्ष | तीन अगर अधिक वर्षें |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | „ | २-०-० |
| चालू डिपॉझिट | „ | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
एस. एच. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



दि

## युनायटेड कमर्शिअल बँक लि.

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६० लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

ईश्वरीप्रसाद गोएंका, व्हाइस चेअरमन — रमणलाल जी. सरय्या, व्हाइस चेअरमन

अनंत चरण लॉ — महादेव एल. डहाणूकर

बैजनाथ जालन — मदनमोहन आर. रुइया

गोविंदलाल बंगूर — मोहनलाल एल. शहा

पी. डी. हिमतसिंगका — मोतीलाल तापुरिया

रामेश्वरलाल नोपानी — नवीनचंद्र मफतलाल

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्यां सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.